# लिंबू

*Citrus limon* (L.) Osbeck Family: Rutaceae



**विविध भाषांमधील नावे:**

इंग्रजी: Lemon, मराठी: लिंबू, कानडी: निंबे, लिंबे, गुजराथी: निंबू, खटलिंबू, संस्कृत: आम्लसार, निम्बु, निम्बुक, रोचना, लिम्पका, शोधना, हिंदी: कागज़ीनिंबू, निंबू, नेबू, लिंबू, लेबू

## Morphology:

The lemon (Citrus limon) is a species of small evergreen trees in the flowering plant. The tree's ellipsoidal yellow fruit is used for culinary and non-culinary purposes throughout the world, primarily for its juice, which has both culinary and cleaning uses.

**वनस्पतीचे वर्णन:**



लिंबाच्या झाडाला लिंब किंवा निंब म्हणतात. हे झुडुप असते. पान जेथे देठाला चिकटते. देठाला लहान काटे असतात. पानाच्या बेचक्यात फूल आणि फळ येते. लिंबाच्या अनेक जाती आहेत, महाळुंग, ईडलिंबू, जंबीर, कागदीलिंबू, वगैरे. कागदी लिंबू हे भारतीयांच्या अन्नात रोजच्या वापरात असलेले एक आंबट चवीचे फळ आहे. हे फळ कच्चे असताना हिरवे व पिकल्यावर पिवळ्या रंगाचे होते. लिंबाचे ईडलिंबू आणि कागदी लिंबू असे दोन मुख्य प्रकार आहेत.

**बहर येण्याचा कालावधी-** वर्षभर

**औषधी उपयोग:**

लठ्ठपणा कमी करण्यासाठी दररोज सकाळी उपाशीपोटी गरम पाण्याबरोबर लिंबूसेवन केल्यास अतिरिक्त चरबी कमीहोते.पित्त झाल्यास रोज लिंबाचे सरबत घेतल्यास भूक वाढते. अन्न पचते व शौचास साफ होते. वाळलेले लिंबू मधात घालून चाटण म्हणून घेतल्यास उचकी तसेच ओकारी थांबण्यास मदत होते. अंगाला कंड सुटत असल्यास लिंबाचा रस खोबरेल तेलात मिसळून अंगास चोळतात व गरम पाण्याने स्नान करतात. .नायटे व डोक्यातील खवडे यावरही लिंबाचा रस चोळल्याने चांगला परिणाम होतो.

**लागवड पद्धत:**